**परिपत्रक क्रमांक ३४६ दिनांक १६/१०/२००८**

असे निदर्शनास आले आहे की, परिशिष्ट-१ मध्ये ज्या नोंदी करण्यात येतात त्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून साक्षांकीत होत नाहीत व अशा साक्षांकीत न केलेल्या परिशिष्ट-१ च्या प्रती संबंधीतांना/पक्षकार/हितचिंतकांना देण्यात येतात, जे नियमबाहय आहे.

तरी याबाबत संबंधित सर्व विभागीय अधिकाऱ्यांना सूचित करण्यात येते की, नोंदणीकृत न्यासांच्या अदययावत झालेल्या परिशिष्ट-१ वरिल नोंदी परिपत्रकाच्या दिनांकानुसार एक महिन्याचे आत साक्षांकीत करण्यात याव्यात व तसा अहवाल या कार्यालयास त्वरित पाठवावा.

त्याचप्रमाणे यापुढे परिशिष्ट-१ मध्ये ज्या नोंदी होतील त्या संबंधित अधिकाऱ्यांनी वेळचेवेळी सांक्षांकीत होतील याची खबरदारी घ्यावी.

तसेच प्रमाणित प्रती पुरवितांना त्या साक्षांकित झाल्यानंतरच देण्यात याव्यात.

या परिपत्रकाची अंमलबजावणी त्वरित करण्यात यावी.

(सु. धों. मोहोड)
धर्मादाय आयुक्त,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रति,

धर्मादाय सह आयुक्त,
मुंबई/बृहन्मुंबई/पूणे/कोल्हापूर/नाशिक/औरंगाबाद/लातूर/नागपूर/अमरावती

धर्मादाय उप आयुक्त,
मुंबई/बृहन्मुंबई/पूणे/कोल्हापूर/नाशिक/औरंगाबाद/लातूर/नागपूर/अमरावती

सहायक धर्मादाय आयुक्त,
मुंबई/बृहन्मुंबई/पूणे/नाशिक/औरंगाबाद/लातूर/नागपूर/अमरावती/
सोलापूर/सांगली/सातारा/रत्नागिरी/सिंधुदूर्ग/ठाणे/रायगड/अहमदनगर/
जळगांव/धुळे/जालना/परभणी/नांदेड/बीड/उस्मानाबाद/भंडारा/यवतमाळ/
चंद्रपूर/गडचिरोली/वर्धा/अकोला/बुलढाणा

मभिसरनोबत/१६१०२००८